स्थापना
१ मे १९५७

उपबाजार 2026-2027\प्रसि... 20...

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७

www puneapmc.org / Emall : kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/स्थापत्य/ना.म.मोशी उप.वा./पा.टा.सा.क./प्रसिध्दीपत्रक/१५७८/२०२६-२७ दि.१५/०९/२०२६

प्रसिध्दीपत्रक

विषय :- कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या, श्री नागेश्वर महाराज मोशी उपबाजार येथील पाण्याच्या टाक्या अत्याधुनिक पध्दतीने साफ करणे कामाबाबत...

सक्षम ठेकेदारांना कळविणेत येते की, **कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या, श्री नागेश्वर महाराज मोशी उपबाजार येथील पाण्याच्या टाक्या अत्याधुनिक पध्दतीने साफ** करावयाच्या आहेत. सदर काम हे शासनाने आदेशित केलेल्या सर्व अटींचे काटेकोरपणे पालन करूनच करावयाचे आहे. काम करतेवेळी कोणत्याही कामगारांची वित्त / जिवितहानी / अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जवावदारी ठेकेदाराची राहील. काम करावयाच्या ठिकाणी आपण स्वत: (ठेकेदार) यांनी संस्थेच्या स्थापत्य विभागाच्या संवंधित अधिकारी / कामाचे वास्तुशास्त्रज्ञ / कर्मचाऱ्यासोवत जाऊन, प्रत्यक्षरित्या कामाची पाहणी करुन तद्नंतरच आपल्या मोहरवंद दरपत्रके सादर करावीत. काम करतेवेळी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्याची सर्वस्वी जवावदारी ही संवंधीत ठेकेदाराची राहील.

तरी सदर कामाची अल्प मुदतीचे मोहरवंद दरपत्रके दि.१९/०९/२०२६ अखेर स्थापत्य विभागात सादर करावीत. सादर झालेली मोहरवंद अल्प मुदतीचे दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी अथवा दि.२१/०९/२०२६ रोजी उपस्थित ठेकेदारांसमोर उघडण्यात येतील, कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेने राखुन ठेवला आहे. तसेच **मा. संचालक मंडळ सभेतील ठराव क्र. ६ (२८) अन्वये सदर कामांबावत संस्थेच्या कंत्राटदार नामिकेवरील कंत्राटदारांकडून दरपत्रके मागवून काम करुन घेणेवावत निर्णय झालेला आहे.** त्यामुळे वाजार समितीच्या पॅनेलवरील कंत्राटदारांकडून प्राप्त झालेली मोहरवंद दरपत्रके ग्राह्य धरणेत येईल, याची नोंद घ्यावी.

सदरचे (www.apmcpunc.in) प्रसिद्धीपत्रक मुख्य कार्यालयाच्या नोटीस वोर्डवर व वाजार समितीच्या संकेतस्थळावर दर्शविणेत येत आहे.

/सचिव

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे